# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 26/03/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

### पोलीस स्टेशन उमरेड नागपूर (ग्रामीण), ची जुगार अडयावर धाड

पो.स्टे. उमरेड :- अंतर्गत 05 किमी अंतरावर मौजा कळमना शिवार येथे दिनांक 25/03/20 चे 17/30 ते 18/15 वा. दरम्यान उमरेड पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम वरील नमुद घटनास्थळी मोठया प्रमाणात तासपत्यावर पैशांची बाजी लावून जुगार अड्डा चालवुन खेळ खेळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून छापा घातला असता आरोपी नामे - 1) आकाश भाउसिंग चव्हाण, वय 27 वर्ष, रा. लोहारा, 2) अमृत लक्ष्मण मोहतकर, वय 34 वर्ष, रा. कळमना, 3) प्रफुल रामकृष्ण लोडे, वय 21 वर्ष, रा. कळमना, 4) संदिप जानराव बेले, वय 39 वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड, 5) रविंद्र तुकारामजी मोहतकर, वय 25 वर्ष, रा. कळमना, 6) किष्णा ज्ञानेश्वर भोयर, वय 25 वर्ष, रा. लोहारा, 7) हिरो शाईन मोटरसायकलचा क्र. एमएच- 40/बिएस- 2201 चा चालक व 8) हिरो पॅशन मोटरसायकल क्र. एम एच- 40/बिवाय- 3543 चा चालक वरील सर्व आरोपी हे कळमना शिवारात पडीत शेतात तासपत्त्यावर पैशांची बाजी लावून पैशांचा हारजितचा प्रत्यक्ष जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 52 तासपत्ते, नगदी 28,000/- रू., 01 चारचाकी टाटा सुमो वाहन व सहा दुचाकी वाहन असे वाहनाची किंमती 4,45,000/-रू. असा एकुण 4,78,400/- रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक अरविंद चव्हाण पोलीसांनी पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 12 मुंबई जुगार कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस पोहवा 85 अरूण जयगिपुरे पो स्टे उमरेड मो नं 9049175485 हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. बोरी :- अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर हळदगााव शिवार येथे दिनांक 25/3/2020 चे 11.00 वा. पुर्वी अनोळखी पुरूष वय अंदाजे 40 ते 45 वर्ष याने अज्ञात कारणाने पळसाच्या झाडाला पिवळया रंगाच्या नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- हरिभाउ चंपतराव करडभाजने, वय 40 वर्ष, रा. हळदगाव यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार वडमे 9922171481 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर